क्र.का.4/प्र.क्र.3047/07/148
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय,पुणे1,
दि.29/01/2007

विषय - नोंदणी प्रकियेत वापरल्या जाणा-या मुखत्यारपत्राबाबत.

<u>परिपत्रक</u> : -

कुलमुखत्यारपत्राचे आधारे, दस्त नोंदणीस दाखल करण्यास आला असेल तर किंवा मुखत्यारपत्राचे आधारे कबुलीजबाब देण्यात येत असेल तर दुय्यम निंबधक यांनी कोणती कार्यपध्दती अनुसरावी याबाबत सविस्तर सुचना वेळोवेळी देण्यात आल्या आहेत.

या कार्यालयाकडे प्राप्त तक्रार प्रकरणांवरुन असे निदर्शनास आले आहे की, कुलमुखत्यारपत्र रद्द करण्यात आले होते/ कुलमुखत्यारपत्र लिहून देणारी व्यक्ती मयत झालेली आहे, त्यामुळे कुलमुखत्यारपत्र रद्दबाबत ठरले आहे. तरीदेखील ते कुलमुखत्यारपत्र दस्तनोंदणी प्रकियेत ग्राहय धरण्यात आले. सबब, संबंधित दुय्यम निंबधकांवर कारवाई करावी अशा स्वरुपाच्या तक्रारी वारंवार विभागाकडे येतात. काही वेळा संबंधित दुय्यम निंबधकाविरुध्द पोलीस विभागाकडे तक्रारी केल्या जातात.

वास्तविक अशी परिस्थिती असेल तर, त्या कुलमुखत्यारपत्राचा वापर न करणे हे संबंधित पक्षकारावर बंधनकारक असते. कुलमुखत्यारपत्र रद्दवातल झाले आहे किंवा नाही याची खातरजमा करणे दुय्यम निंबधक यांना शक्य नसते. तरी देखील दुय्यम निंबधकांविरुध्द विनाकारण तक्रारी होवू नयेत तसेच मिळकत विकत घेणा-या पक्षाची रद्दबाबत ठरलेल्या कुलमुखत्यारपत्राचा वापर करुन फसवणूक करण्यास प्रतिबंध घातला जावा या हेतूने पुढीलप्रमाणे मार्गदर्शन सुचना देण्यात येत आहेत.

1. दस्त कुलमुखत्यारपत्राचे आधारे नोंदणीस दाखल करण्यात आला असेल व/ किंवा कबुलीजबाब देण्यात येत असेल तर कुलमुखत्यारधारकाचे पुढील नमुन्यात घोषणापत्र घेण्यात यावे.

घोषणापत्र.

मी .....याव्दारे घोषित करतो की, दुय्यम निंबधक .....यांचे कार्यालयात ..... या शिर्षकांचा दस्त नोंदणीसाठी सादर केला आहे. श्री.....व इतर यांनी दि ..... रोजी मला दिलेल्या कुलमुखत्यारपत्राच्या आधारे मी सदर दस्त नोंदणीस सादर केला आहे/ निष्पादित करुन कबुलीजबाब दिला आहे. सदर कुलमुखत्यारपत्र लिहून देणार यांनी कुलमुखत्यारपत्र रद्द केलेले नाही किंवा कुलमुखत्यारपत्र लिहून देणार व्यक्तीपैकी कोणीही मयत झालेले नाही किंवा अन्य कोणत्याही कुलमुखत्यारपत्र रद्दबातल ठरलेले नाही. सदरचे कुलमुखत्यारपत्र पुर्णपणे वैध

असून उपरोक्त कृती करण्यास मी पुर्णत: सक्षम आहे. सदरचे कथन चुकीचे आढळून आल्यास, नोंदणी अधिनियम 1908 चे कलम 82 अन्वये मी शिक्षेस पात्र राहीन.यांची मला जाणीव आहे.

दिनांक ..... कुलमुखत्यारपत्रधारकाचे नाव
व सही

2. वरीलप्रमाणे घेतलेले घोषणापत्र मूळ दस्तऐवजाचा भाग करण्यात यावे. जेणेकरुन त्याचे स्कॅनिंग होईल आणि ते अभिलेखात समाविष्ट होईल.

याच परिपत्रकाव्दारे असेही स्पष्ट करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे कथन दस्तऐवजामध्ये समाविष्ट असेल तर स्वतंत्र घोषणापत्राची आवश्यकता नाही. प्रस्तुतचे घोषणापत्र दुय्यम निंबधक कार्यालयातील कामकाजाकरिता निष्पादित करण्यात येत असल्याने त्यास स्वतंत्र मुदांक शुल्काची आवश्यकता नाही.

(सही/- ओमप्रकाश गुप्ता)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक.
महाराष्ट्र राज्य,पुणे.

प्रति:- सर्व दुय्यम निंबधक (**संबंधित सहजिल्हा निंबधक यांचेमार्फत**)
प्रत - 1. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक.
2. सर्व सह जिल्हा निंबधक
3. सर्व कार्यासन अधिकारी,. नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4. महाराष्ट्र राज्य तलाठी संघ, रेव्हेन्यू क्लब तहसील कार्यालयाजवळ कोरेगाव जि. सातारा यांना

त्यांचे दि 08/01/2007 चे पत्राचे अनुषगाने माहितीस्तव.